महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

आज़ादी का अमृत महोत्सव

क्र.संवैशिवसं/न्याय प्र./मुळ अर्ज क्र.२८०,३५९,७०७/२०२४/११५०८ /२०२४,दि. २४/०७/२०२४

# नोटीस

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय / दंत/आयुर्वेद/होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालयातील तसेच मानसिक आरोग्य केंद्र येथील गट-क तांत्रिक संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ व प्रयोगशाळा सहाय्यक रिक्त पदे भरण्याकरीता राबविण्यात आलेल्या स्पर्धा परिक्षा - २०२३ मध्ये ज्या उमेदवारांनी महाराष्ट्र परावैद्यक परिषदेची नोंदणी प्रमाणपत्र सादर न केल्याने संचालनालयाने दि.१९/०२/२०२४ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या पात्र/अपात्र यादीत अपात्र दर्शविण्यात आले होते. या विरोधात काही उमेदवारांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र.२८०/२०२४, क्र.३५९/२०२४ व ७०७/२०२४ दाखल केले होते.

मा.न्यायाधिकरणाने दि.२३/०७/२०२४ रोजी सुनावणी दरम्यान दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने संचालनालयाने दि.१९/०२/२०२४ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या यादीतील महाराष्ट्र परावैद्यक परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र सादर न केल्याच्या कारणास्तव अपात्र केलेल्या उमेदवारांना कळविण्यात येते की, त्यांनी महाराष्ट्र परावैद्यक परिषदेचीा नोंदणी प्रमाणपत्र दि.३१/०७/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत संचालनालयास प्रत्यक्षरित्या उपस्थित राहून सादर करावे.

दि.३१/०७/२०२४ नंतर सादर केलेल्या महाराष्ट्र परावैद्यक परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्रांचा अथवा त्या अनुषंगिक येणारे कोणते ही निवेदने विचार करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष